दैनिक
# वादळ वार्ता
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे निर्भिड दैनिक
मुख्य संपादक : अजश भांगे

बीड/महाराष्ट्र ● शनिवार दि.२२ फेब्रुवारी २०२५ ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष २ रे ● अंक-११८ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

## मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देणे माझे सौभाग्य

**नवी दिल्ली–**अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचा उद्घाटन सोहळा राजधानी दिल्ली येथे पार पडला. या कार्यक्रमाचे उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी स्वागताध्यक्ष म्हणून शरद पवार उपस्थित होते. यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी उपस्थितांशी संवाद साधताना मराठी भाषेतून संवाद साधला. यावेळी मराठी भाषेवरील आपले प्रेम देखील मोदींनी व्यक्त केले.पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले, कार्यक्रमाला उपस्थित वरिष्ठ नेता शरद पावर, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष तारा भवाळकर व समस्त मराठी भाषेचे विद्वान, ताराबाईंचे भाषण ऐकल्यावर मी म्हंटले 'फार छान' त्यावर त्यांनी पण मला गुजराती भाषेत उत्तर दिले.देशाच्या आर्थिक राजधानी आणि राज्यातून देशाच्या राजधानीत आलेल्या सर्व मराठी साहित्यिकांना माझा नमस्कार, असे मोदी यांनी मराठीमध्ये म्हटले. आज दिल्लीच्या धर्तीवर मराठी भाषेच्या या कार्यक्रमाचे आयोजन होत आहे. अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन हे एक भाषेपूर्ते मर्यादित नाही. संत तुकारामांच्या मराठीला दिल्ली अतिशय मनापासून नमन करते.

# देशाच्या कानाकोपऱ्यात मराठी माणूस प्रधानमंत्री मोदी आले याचा मला फार आनंद

## शरद पवारांनी केले पंतप्रधान नरेंद्र मोदींचे कौतुक

नवी दिल्ली (वृत्तसंस्था)–अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचा उद्घाटन सोहळा राजधानी दिल्ली येथे पार पडला. या कार्यक्रमाचे उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी स्वागताध्यक्ष म्हणून शरद पवार उपस्थित होते. यावेळी शरद पवार यांनी पंतप्रधान मोदींचे कौतुकही केले आहे.शरद पवार म्हणाले, मराठी माणूस केवळ महाराष्ट्रात नव्हे तर आपल्या महाराष्ट्राचा झेंडा अटकेपार फडकावला आहे. दिल्ली मध्ये दिसतो, हरियाणामध्ये दिसतो, गुजरातमध्ये दिसतो. देशाच्या कानाकोपऱ्यात मराठी माणूस दिसून येतो. अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन राजधानीत दुसऱ्यांदा होत आहे. यावेळी देशाचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आले याचा मला फार आनंद झाला आहे. महाराष्ट्र शासन, महाराष्ट्राचे रसिक, साहित्यिक या सर्वांनी पाठपुरावा केला आणि मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा पंतप्रधान मोदींनी मिळवून दिले.

पुढे बालताना शरद पवार म्हणाले, १९५४ साली पहिल्यांदा दिल्लीला मराठी साहित्य संमेलन झाले. त्यावेळी देशाचे प्रधानमंत्री जवाहरलाल नेहरू होते. त्यांनी याचे उद्घाटन केले होते. मी जेव्हा याचे निमंत्रण देण्यासाठी गेलो तेव्हा मोदींनी एक मिनिट सुद्धा लावला नाही आणि महाराष्ट्राचा हा कार्यक्रम आहे तर माझी उपस्थिती असणार आहे असे त्यांनी सांगून टाकले. इतकी संमेलने झाली, मात्र केवळ चार महिलांनाच संमेलनाचे अध्यक्षपद मिळाले. तारा भवाळकर यांना संमेलनाचे अध्यक्षपद मिळाले हे आनंददायी आहे. दिल्ली आणि महाराष्ट्राचे एक नाते आहे. महाराष्ट्र आणि दिल्लीचे राजकीय आणि सांस्कृतिक संबंध आहेत, असे शरद पवार यांनी म्हटले आहे.दरम्यान पुढे बोलताना ते म्हणाले की, साहित्य क्षेत्रात अनेक भगिनींनी भर घातली आहे. साहित्य संमेलन म्हटले की राजकारण्यांचा इथे काय संबंध अशी चर्चा सुरू होते. राजकारण आणि साहित्य यांच्यातील संबंध जवळचा आहे. सध्या संवाद कठीण आणि नाजूक परिस्थितीमधून जात आहे. त्यामुळे आता साहित्यिकांची जबाबदारी वाढली आहे. संमेलनासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी उपस्थित आहेत, त्यासाठी मी त्यांचे आभार मानतो, असेही शरद पवार यावेळी म्हणाले.




# बीड जिल्हा पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष जाहीर ;प्रदेश उपाध्यक्ष पदी प्रफुल्ल सहस्त्रबुद्धे

## महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या परळी तालुका अध्यक्षपदी बालासाहेब फड यांची निवड

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या बीड जिल्हा शाखेने जिल्ह्यातील तालुका पत्रकार संघाच्या अध्यक्षांच्या नियुक्त्या जाहीर केल्या आहेत.तसेच आष्टी येथील ज्येष्ठ पत्रकार प्रफुल्ल सहस्त्रबुद्धे यांची प्रदेश उपाध्यक्षपदी नियुक्ती केली आहे.इलेक्ट्रॉनिक मीडियाच्या बीड जिल्हाध्यक्ष पदी दीपक जाधव यांची तर बीड शहर पत्रकार संघाच्या अध्यक्ष पदी प्रतिक कांबळे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.सर्व नवनियुक्त तालुकाध्यक्ष यांनी तत्काळ नवीन सभासद नोंदणी करून तालुकास्तरीय उर्वरित कार्यकारिणी जाहीर करावी असेही कळवण्यात आले आहे.

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे आणि राज्य समन्वयक संतोष मानूरकर यांच्या नेतृत्वाखाली कार्यरत असलेल्या पत्रकार संघाचे बीड जिल्हाध्यक्ष बालाजी तोंडे आणि जिल्हाध्यक्ष शेख रिझवान यांनी जिल्ह्यातील नवीन तालुकाध्यक्षांची नियुक्ती जाहीर केली आहे.या मध्ये बीड – धनंजय गुंदेकर ,परळी – बालासाहेब फड ,अंबाजोगाई – गोविंद महाराज केंद्रे ,केज – दुर्गादास लांब ,आष्टी – प्रविण पोकळे,धारूर –परमेश्वर राऊत ,पाटोदा – महेश बेदरे ,शिरूर –शहेबाज पठाण ,माजलगाव –अंगद दराडे ,गेवराई– राहुल लोंढे ,वडवणी – दत्ता कराड यांचा समावेश आहे.तसेच बीड शहर अध्यक्ष पदी प्रतिक कांबळे यांची नियुक्ती करण्यात आली असून जिल्ह्यातील सर्व शहर अध्यक्षांची नियुक्ती करण्यासाठी त्यांना प्रभारी करण्यात आले आहे.त्याच प्रमाणे प्रदेश उपाध्यक्ष या रिक्त पदी आष्टी चे ज्येष्ठ पत्रकार प्रफुल्ल सहस्त्रबुद्धे यांची राज्य कार्यकारी समितीच्या मान्यतेने नियुक्ती करण्यात आली आहे.सर्व नवनियुक्त पदाधिकाऱ्यांनी आपल्या तालुक्यात आणि शहरात नवीन सभासद नोंदणी करून स्थानिक कार्यकारिणी जाहीर करावी असे जिल्हा संघाच्या वतीने सांगण्यात आले आहे. सर्व तालुका अध्यक्ष यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.



# धनराज थोरातांचा लग्नाचा वाढदिवस सेवाश्रमात साजरा

## विद्यार्थ्यांना शालेय साहित्य, निराधारांना फळे,अल्पोपहार

> समाजातील दु:खित दुर्बल घटकांचे दु:ख आपन वाटून घेवू शकत नाहीत परंतु त्यांना आधार देवून आपन त्यांच्यासोबत आहोत या कृतितुन त्यांच मनोबल नक्कीच वाढु शकते अविस्मरणीय क्षणी भेट देवून त्यांच् दु:ख हलक करून त्यांना आनंद देण्याच कार्य केले पाहिजे हीच आपली ऊर्जा त्यांना भक्कम आधाराची प्रेरना देत राहते
>
> –धनराज थोरात
> सी बी ओ स्टेट बैंक
> ऑफ इंडिया अंबाजोगाई



**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील कुंभेफळ येथील रहिवाशी व आंबेजोगाई एसबीआय बँकेत कार्यरत असलेले धनराज थोरात यांनी लग्नाच्या वाढदिवस सेवाश्रमात साजरा करून विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप केले निराधारांना फळे वाटप करून अल्पोपहार देण्यात आला. या सामाजिक उपक्रमाबद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक केले जात आहे

सामाजिक जाणीव ठेवून लग्नाचा वाढदिवस सेवाश्रमात साजरा करून बैंक अधिकाऱ्यांने समाजात एक आदर्श निर्माण केला. धनराज थोरात सध्या स्टेट बैंक ऑफ इंडिया च्या अंबजोगाइ शाखेत उइज पदावर कार्यरत आहेत उतराई होण्याचा प्रयत्न आपन कुठल्या न कुठल्या माध्यमातुन केला पाहिजे यामधून प्रेरीत होवून त्यांनी लग्नाचा वाढदिवस घाटनांदूर येथील गुरुदास सेवाश्रमातिल विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप,निराधाराणा फळ वाटप करून अल्पपोहार देवून त्यांच्याशी हितगुज करून त्यांचे मनोबल उंचावन्यासाठी आपल्या परिवार व मित्रपरीवारसोबत साजरा केला. स्तुत्य उपक्रमास मित्रपरिवार संदीप थोरात,अमोल थोरात,मधुकर सांगळे,प्रह्लाद जाधव व त्यांच्या पत्नी,संदीप जाधव,हनुमंत जाधव उपस्थित होते.

# धम्मभूमी मौजे शिवणी येथे माता रमाई जयंती संपन्न



**बीड । प्रतिनिधी**

प्रियदर्शी धम्मसंस्कार शिक्षण संस्था बीडच्या वतीने धम्मभूमी मौजे शिवणी येथे त्यागमूर्ती माता रमाई यांची जयंती उत्साहात संपन्न करण्यात आली. याप्रसंगी पूज्य भिक्ख महाविरो थेरो काळेगाव अहमदपूर यांच्या हस्ते तथागताच्या प्रतिमेस तर प्रमुख अतिथी प्रा.डॉ. भारती फुलेकर यांच्या हस्ते भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर व त्यागमूर्ती माता रमाई यांच्या यांच्या प्रतिमेस पुष्प व पुष्पमाला अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. सामुदायिक त्रिशरण पंचशील ग्रहण केल्यानंतर पूज्य भिक्खु महाविरो थेरो यांनी आपल्या धम्मदेशेत माघ पौर्णिमेच्या दिवशी तथागताच्या जीवनात घडलेल्या घटनेबद्दल सविस्तर माहिती दिली. सध्याच्या इंटरनेट,मोबाईलच्या जमान्यात माणूस माणसापासून दूर जात आहे. परंतु माणसाने माणसाशी कसे वागावे हे तथागताने विपश्यनेच्या मार्गातून माणूस त्रिशरण, पंचशील, व दहा पारमितेच्या पालनास तयार होतो. मैत्री, प्रेम, करुणा, यासारख्या दहा पारमिता पाळून कुशल कर्म करण्यास तत्पर होतो हे अनेक उदाहरणाद्वारे सांगितले. प्रमुख अतिथी प्रा.डॉ.भारती फुलेकर यांनी त्यागमूर्ती माता रमाईच्या जीवनातील डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या शिक्षणाकरिता केलेला त्याग व समाज हितासाठी, देशासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर करीत असलेल्या प्रयत्नांना सावलीसारखी सोबत दिली. अशा प्रकारच्या माता रमाईच्या जीवनातील अनेक दुःखद प्रसंग सांगून सर्वांच्या डोळ्यासमोर त्यांचा जीवनपट उभा केला. तेव्हा सर्व उपस्थित गहिवरून गेले. याप्रसंगी लहान, बालक, बालिकांनी माता रमाईच्या जीवनावर गीत व नाट्यप्रसंग करून दाखवले. कार्यक्रमाचे प्रस्ताविक अलकाताई डोंगरे यांनी केले तर सूत्रसंचालन वंदनाताई वाघमारे यांनी केले. सर्वांचे आभार ज्योतीताई सरवदे यांनी व्यक्त केले. कार्यक्रमास परिसरातील महिला पुरुष व बालकांची व संस्थेच्या बहुतांश सदस्यांची उपस्थिती होती. सरणातय व भोजनदान खीर दानाने कार्यक्रमाची सांगता झाली.

# बीडचे खा.बजरंग सोनवणेंची परदेशात क्रेझ शिवजयंतीनिमीत्त आले अबुधाबीतून निमंत्रण

## २३ फेब्रुवारी मोठ्या थाटात शिवजन्मोत्सव होणार साजरा

**केज । प्रतिनिधी**

महाराष्ट्रासह देशभरात आणि आता जगभरात छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी होत आहे. यावर्षी अरब देशातील अबुधाबीमध्ये दि.२३ फेब्रुवारी रोजी छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्सवाचे आयोजन करण्यात आलेले असून या कार्यक्रमाला प्रमूख पाहूणे म्हणून बीडचे खा.बजरंग सोनवणे यांना निमंत्रीत करण्यात आले आहे.

छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती जगभरातील विविध देशात साजरी केली जात आहे. महाराष्ट्र आणि हिंदूस्थानातील नागरिक परदेशात आता शिवजयंती साजरी करू लागले आहे. अरब देशातील अबुधाबी येथे मागील सात वर्षांपासून उमेश नळगे पाटील, प्रदिप आघाव हे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीचे आयोजन करत आहेत. यावर्षीही जयंती उत्सव मोठ्या जल्लोषात साजरा करण्यात येत आहे. दरवर्षी वेगवेगळ्या क्षेत्रातील मान्यवरांना या जयंती उत्सवाचे निमंत्रण दिले जात असते. यावर्षी बीड जिल्ह्यातील जनतेने मोठ्या विश्वासाने निवडून दिलेले खा.बजरंग सोनवणे यांना प्रमुख म्हणून निमंत्रीत केले आहे. त्यांच्यसोबत मोलीजीराजे शाहू छत्रपती, मंत्री आयुष स्वतंत्र प्रभार आरोग्य व कुटूंब कल्याण राज्यमंत्री भारत सरकार–ना.प्रतापराव जाधव यांनाही निमंत्रीत करण्यात आलेले आहे. खा.बजरंग सोनवणे यांनी लोकसभा निवडणूकीत विजयी झाल्यानंतर तातडीने बीड–अहिल्यानगर रेल्वेप्रश्नी लक्ष घातलेले आहे. या शिवाय मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणी सर्वप्रथम आवाज उठविला होता. अगदी संसदेत सुध्दा त्यांनी हा विषय पोटतिडकीने आणि माणूसकीच्या नात्याने मांडून महाराष्ट्रासह देशभरातील नागरिकांचे लक्ष वेधून घेतले होते. याच कारणाने महाराष्ट्रासह परदेशातील भारतीय नागरिकांमध्ये खा.बजरंग सोनवणे यांची क्रेझ निर्माण झाली आहे. दि.२३ फेब्रुवारी रोजी अबुधाबी येथे होत असलेल्या शिवजयंती कार्यक्रमास ते उपस्थित राहून भारतीय नागरिक आणि शिवप्रेमींशी ते संवाद साधणार आहेत. बीडचे खा.बजरंग सोनवणे हे अबुधाबीला जयंतीनिमीत्त जात असल्याने ही जिल्ह्यासाठी गौरवाची बाब आहे.



# बीडच्या महिला जिजाऊ रत्न पुरस्काराने सन्मानित

**बीड (प्रतिनिधी):** शिवजयंतीनिमित्त महिला मराठा क्रांती ग्रुपच्या वतीने यंदा बीडमधील तीन महिलांना जिजाऊ रत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.महिला मराठा क्रांती ग्रुप दरवर्षी शिवजयंतीनिमित्त हा उपक्रम राबविला जातो.

शांतिनिकेतन इंग्लिश स्कूलमध्ये शिवजयंतीनिमित्त कार्यक्रम झाला. या पुरस्काराचे वितरण डॉ अशोक कोल्हे, माजी जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी तथा सध्याचे कार्यकारी अधिकारी सारथी, पुणे, डॉ प्रमोद शिंदे सर, मराठा क्रांती मोर्चा समन्वयक, बीड नगरपालिकेचे माजी नगराध्यक्ष दिलीप अण्णा गोरे, विठ्ठल गोरे सर, यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमात शिवमती सीताबाई बलभीमराव जाधव, शिवमती निलावती मच्छिंद्र गायकवाड, शिवमती अश्रुगा उत्तरेश्वर जाधव यांना जिजाऊ रत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यावेळी प्रास्ताविक करताना रत्नमालाताई धांडे यांनी पुरस्कार देण्याचा उद्देश सांगताना ज्या माता भगिनी आपली कौटुंबिक जबाबदारी पार पाडत मुलांवरती सामाजिक संस्कार करतात अशा माता भगिनींचा सत्कार व्हावा या शुद्ध हेतूने पुरस्कारने सन्मानित करण्यात येते. कुंदाताई काळे यांनी या पुरस्काराची व्याप्ती राज्यभर असून पुढील वर्षापासून सांगली सातारा या ठिकाणच्या माता भगिनींना पुरस्कार देण्याचा मानस व्यक्त केला. तसेच दिलीप अण्णा गोरे यांनी पुरस्कार देण्यात आलेल्या सर्व मातांचे अभिनंदन करत महिला क्रांती मोर्चाचे या कार्यक्रमाबद्दल जाहीर आभार मानले. डॉक्टर अशोक कोल्हे यांनी सारथी अंतर्गत चालू असलेल्या विविध योजनांची माहिती उपस्थितांना दिली. यामध्ये प्रामुख्याने परदेशी शिक्षणासाठी एम एस व परदेशामध्ये पीएचडी करण्यासाठी मिळणाऱ्या शिष्यवृत्तीची संपूर्ण माहिती दिली. डॉक्टर प्रमोद शिंदे यांनी आयोजकांचे कौतुक करत सर्वांचे अभिनंदन केले. यावेळी सी ए बी बी जाधव यांनी महिला मराठा क्रांती मोर्चाचे आभार मनात आईचे ऋण प्रत्येक व्यक्तीवर आयुष्यभर असतात आणि ते अशा कार्यक्रमाच्या निमित्ताने व्यक्त केला.

## संपादकीय..

# वाचन संकल्प



महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या वतीने दिनांक २० डिसेंबर २०२४ च्या शासन परिपत्रकानुसार ‘वाचन संकल्प महाराष्ट्राचा’ हा उपक्रम १ ते १५ जानेवारी या कालावधीत घेण्यात आला. शासन परिपत्रकानुसार हा उपक्रम आपल्या राज्यातील महाविद्यालये, सार्वजनिक वाचनालये व विद्यापीठे या स्तरावर राबविण्यात आला. यात राज्यातील तरुणाई पुस्तक वाचनाकडे आकर्षित होण्यासाठी तसेच वाचन संस्कृती वाढवण्यासाठी हा उपक्रम अतिशय चांगला आहे. मात्र हे आधी व्हायला पाहिजे होते.सध्या बरीच वाचनालये वाचक वर्गांची वाट पाहत असताना दिसतात. तेव्हा विद्यार्थी तसेच नागरिक वाचनालयाचे सभासद जरी असले तरी किमान आठवड्यातून दोन किंवा तीन वेळा आपल्या सवडीने वाचनालयात जावे,तर विद्यार्थ्यांनी नियमित आपल्या वेळेनुसार वाचनालयात गेले पाहिजे. असे जर झाले असते, तर आज शासनाला राज्यात वाचन संकल्प करावा लागला नसता. शासन परिपत्रक निर्गमित झाल्यानंतर वाचन संकल्प महाराष्ट्राचा हा उपक्रम राबविण्यासाठी काही महाविद्यालयाअंतर्गत समिती स्थापन करण्यात आली. ग्रंथालयातील सेवकांच्या सहकार्याने हा उपक्रम राबविण्यासाठी ग्रंथालयाची साफसफाई करून त्यानंतर ग्रंथप्रदर्शनाचे आयोजिन करण्यात आले. काही ठिकाणी वाचन कौशल्यावर मार्गदर्शन ठेवण्यात आले होते. त्यानंतर विद्यार्थ्यांची ग्रंथालयाला भेट, विद्यार्थी लेखक परिसंवाद तसेच ग्रंथालयाच्या सभागृहात ग्रंथप्रदर्शन ठेवून त्यातील एका पुस्तकाचे किमान एक तास वाचन करणे असा सामूहिक उपक्रम सुद्धा राबविण्यात आला. त्याच्या मागील मूळ उद्देश एकच होता की विद्यार्थ्यांना वाचनाची आवड लागावी. जो तरुण सध्या वाचनापासून दुरावत चालला आहे तो दुरावा दूर करणे होय. त्यासाठी आता विद्यार्थ्यांनी स्वत:हून रोज वाचन केले पाहिजे. यातच त्यांचे खरे हित आहे. वाचाल तरच आपण वाचू शकता ही आजची राज्यातील परिस्थिती आहे. त्यामुळे वाचनाकडे विद्यार्थी तसेच नागरिकांनी दुर्लक्ष करू नये.वाचनाचा विचार करता वाचनामुळे आपले ज्ञान वाढते तसेच आपल्या ज्ञानात अधिक भर पडत असते. सन २०२५ च्या वाचन संकल्पाचा विचार करता हा संकल्प म्हणजे राज्यामध्ये वाचन संस्कृती वाढविणारा आहे. वाचन संकल्प महाराष्ट्र या उपक्रमाचा मूळ उद्देश्य विद्यार्थी, शिक्षक आणि नागरिकांना वाचनाची सवय निर्माण व्हावी होय. यामुळे त्यांचा वैयक्तिक विकास होण्याला मदत होईल. तसेच त्यांच्या जीवनाला नवीन दिशा मिळू शकते. त्याचप्रमाणे वाचनाने ते प्रेरित होऊन त्यांचा आत्मविश्वास वाढण्याला मदत होईल. यासाठी प्रत्येकांनी वाचलेच पाहिजे. तरच आपण वाचू शकतो. वाचनामुळे आपल्यात जाणीव-जागृती निर्माण होते. या उपक्रमामध्ये तरुण मुलांना पुस्तक वाचनाला प्रोत्साहन मिळण्यासाठी पुस्तकाचे सामूहिक वाचन, मुलांचे पुस्तक वाचन, वाचन कौशल्य सुधारण्यासाठी कार्यशाळा, मुलांनी एकमेकांना वाचन संवाद करणे, एखादे पुस्तक परीक्षण आणि पुस्तक वाचून त्याचे सारांश रूपाने कथन करणे असे विविध प्रकारे उपक्रम राबवण्यात आले. हेच उपक्रम मुलांना वाचनाची आवड निर्माण करीत असतात. तसेच वाचनाच्या संदर्भात विविध स्पर्धा आयोजित करण्यात येऊन २६ जानेवारी रोजी विजेत्या स्पर्धकाचा प्रमुख पाहुण्याच्या हस्ते सन्मान करण्यात येणार आहे. यामुळे सुद्धा विद्यार्थ्यांना वाचनाची अधिक गोडी निर्माण होण्याला मदत होणार आहे.

अलीकडच्या काळात मोबाईलच्या दुनियेत वावरणाऱ्या विशेषत: तरुणाईचा विचार करता त्यांनी पुस्तकांकडे अक्षरशः पाठ फिरवलेली दिसते. त्यामुळे हा उपक्रम नक्कीच विद्यार्थ्यांसाठी आनंददायी असून या उपक्रमामुळे पुस्तके वाचण्याकडे मुलांचा कल निर्माण होईल. तसेच वाचनाची आवड निर्माण झाल्याने ग्रंथालयात विद्यार्थी जावू लागतील. केवळ मोबाईलमुळे मुले पुस्तक वाचनाकडे दुर्लक्ष करतात. याचा परिणाम अलीकडच्या काळात जाड काचेतून डोळे फाडून बघण्याची वेळ काही मुलांवर आलेली दिसत आहे. हे राज्यातील तरुणाईसाठी घातक आहे. तेव्हा महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाचा हा उपक्रम स्तुत्य म्हणावा लागेल. आता राज्यातील प्रत्येक मुलांच्या आई-वडिलांनी सुद्धा आपल्या मुलांना पुस्तक वाचनाकडे अधिक लक्ष देणे गरजेचे आहे. तसेच मुलांनी सुद्धा किमान अवांतर पुस्तकी वाचनाकडे दर दिवशी आपला अभ्यास करून अवांतर वाचन केले पाहिजे. यामुळे त्यांच्या अवांतर ज्ञानात वाढ होत असते. विशेष म्हणजे वाचन केल्यामुळे मनावरील ताणतणाव कमी होण्याला मदत होते. तसेच नियमित वाचनामुळे मुले वाचनाकडेआकर्षित होऊन वाईट मार्गालाजात नाहीत. आता जरी २०२५ या नवीन वर्षाचा पंधरवडा वाचन संकल्प महाराष्ट्राचा साजरा केला तरी विद्यार्थ्यांनी प्रत्येक दिवशी काही तास मोबाईलरावांना बाजूला ठेवून किमान अर्धा तास पुस्तकाचे वाचन करावे. वाचनामुळेच आपण वाचू शकतो हे प्रत्येक विद्यार्थ्यांनी लक्षात ठेवले पाहिजे. तेव्हा राज्यातील वाचन संस्कृतीला प्रोत्साहन देण्यासाठी ‘वाचन संकल्प महाराष्ट्राचा’ हा उपक्रम राज्यात सुरू करण्यात आला आहे. त्यामुळे विद्यार्थी, शिक्षक, आणि नागरिक यांना वाचनाची अधिक गोडी वाटणार आहे असे जरी वाटत असले तरी शालेय अभ्यासक्रमात वाचनासाठी विद्यार्थ्यांना दर दिवशी वेळ द्यावा. म्हणजे राज्यातील वाचनालये बंद पडणार नाहीत. तेव्हा आपल्या उज्वल भविष्यासाठी वाचन संस्कृती बळकट करण्यासाठी वाचन संकल्प महाराष्ट्राचा राबवण्यात जरी आला तरी मी दररोज किमान अर्धा तास अवांतर वाचन करेन असा संकल्प विद्यार्थ्यांनी करायला हवा.

# कृत्रिम बुद्धिमत्तेच्या अवकाशात

कृत्रिम बुद्धीमत्तेच्या अवकाशात अमेरिका आणि चीनसारखे तगडे देश आधीपासूनच स्थान राखून असताना पुढील सहा महिन्यांमध्ये भारतही त्यात प्रवेश करत असल्याची बातमी महत्त्वपूर्ण म्हणायला हवी. येणारे युग कृत्रिम बुद्धीमत्तेचे असल्याचे एव्हाना सिद्ध झाले आहे. त्यामुळेच भारत उपलब्ध यंत्रणेच्या पायावर या अवकाशातील आपले इमले रचतो की नव्याने पायाभरणी करतो, हे बघावे लागेल.




अमेरिका आणि चीनपाठोपाठ आता भारतही एआयच्या क्षेत्रामध्ये पाऊल ठेवत असल्याची बातमी अनेकार्थाने महत्त्वपूर्ण म्हणावी लागेल. विशेषत: जगभर ‘डिपसीक’चा बोलबाला असताना भारतीयांनी या बदलाचे महत्त्व आणि होणारे परिणाम जाणून घेणे गरजेचे आहे. अर्थातच त्यासाठी पार्श्वभूमी जाणून घेणे गरजेचे आहे. गेल्या काही वर्षांमध्ये एआय अर्थात कृत्रीम बुद्धिमत्ता हा घटक सर्वसामान्यांच्या आयुष्याशी जोडला गेला आहे. तो त्यांची अनेक कामे सोपी, सुलभ करत असल्याने याची उपयुक्तता आणि आवश्यकता सर्वसामान्यांना समजली आहे. दुसरीकडे, याविषयीची भीतीही बघायला मिळते. अनेकांचे रोजगार जातील का, हा प्रश्नही वारंवार विचारला जातो. मात्र या भीतीपोटी आता चॅटजीपीटीचा वापर थांबणे शक्य नाही. याद्वारे आपल्याला अत्यंत समर्पक उत्तरे मिळतात. केवळ माहितीच नव्हे तर जोडीला व्हीडिओ, ऑडिओ, प्रतिमा हे सगळेही मिळते. चॅटजीपीटीच्या या तंत्रज्ञानामागे लार्ज लँग्वेज मॉडेल (एलएलएम) नामक तंत्रज्ञान वापरले जाते. यातील तांत्रिकतेकडे न बघता अगदी सोप्या भाषेत सांगायचे, तर गुगलचे सर्च इंजिन आणि चॅटजीपीटी यातील फरक लक्षात घेता समजते की, सर्च इंजिनवर आपण आवश्यक ती माहिती पुरवण्याची मागणी नमूद करतो आणि त्यानुसार ते संबंधित माहिती पुरवते. मात्र चॅटजीपीटी वापरत असणाऱ्या एलएलएमकडून मिळालेल्या माहितीचे स्वरूप शब्द पुरवलेल्या मजकुराचे नसते, तर माणसाची नैसर्गिक भाषा अर्थात नॅचरल लँग्वेज प्रोसेसग समजून घेण्याची क्षमता या अत्याधुनिक तंत्रज्ञानात असते. म्हणजेच एखाद्या माणसाला समजतो तसा त्याला विचारलेला प्रश्न समजतो आणि तो समजून माणूस उत्तर देईल, तशा प्रकारे आपल्याजवळ असणाऱ्या माहितीच्या ढिगाऱ्यातून बिनचूक माहिती तो समोर मांडतो. एलएलएमला हे महत्त्व असल्यामुळे तंत्रज्ञानातील नवीन टप्पा अर्थात जनरेटिव्ह एआय असे म्हणतात.नवनिर्मिती करण्याची क्षमता त्याला वेगळे महत्त्व देऊन जाते. थोडक्यात, आपण याला अल्लाउद्दिनचा जादूचा दिवा म्हणू शकतो. असे हे ओपन एआयचे तंत्रज्ञान जगासमोर आणल्यानंतर लोक अक्षरश: चाट पडले होते, कारण आपल्यासमोर असे काही येईल, याची कल्पनाही त्यांनी केली नव्हती. पुढे याच धर्तीवर अल्फाबेट कंपनीचे जेमिनी, फेसबुकच्या मेटा कंपनीचे लामा असे तंत्रज्ञान समोर आले. त्यामुळे या क्षेत्रावर अमेरिकेचे मक्तेदार असल्याचे चित्रही स्पष्ट झाले. ते खरेही होते. या तंत्रज्ञानासाठी माहितीचे मोठमोठे ढीग उपसावे लागतात. त्यासाठी संगणकाची प्रचंड मोठी क्षमता वापरावी लागते. सर्वसामान्यपणे संगणकाचे काम चालवण्यासाठी सेंट्रल प्रोसेसग युनिटचा वापर होतो. तो संगणकाचा मेंदू असतो. मात्र एआयमध्ये हा मेंदू पुरेसा ठरत नाही. म्हणूनच त्यासाठी विशिष्ट प्रकारची चीप वापरली जाते. त्याला ग्राफिकल प्रोसेसग युनिट (जीपीयू) असे म्हणतात. हे जीपीयू तयार करणारी अमेरिकेतील ‘एनव्हिडिया’ ही कंपनी असून तिची या कामात मक्तेदारी आहे. या चीपच्या बळावर सगळी कामे वेगाने केली जातात आणि म्हणूनच हे काम फक्त अमेरिकेतच होऊ शकते, असे समजले जात होते.

एआयमधील आपली एकाधिकारशाही टिकवण्यासाठी काही दिवसांपूर्वी अमेरिकेने या चीप्सच्या निर्मितीवर मर्यादा घातल्या होत्या आणि चीनला चीप्सची आयात करता येऊ नये, अशा प्रकारचे नियमही आणले होते. मात्र हे सगळे अडथळे पार करून त्यांच्या ‘डिपसीक’ या कंपनीने एका वर्षांच्या आत ओपनएआय, जेमिनी, लामा या सगळ्यांसारखे एलएलएम अत्यल्प खर्चामध्ये उभे करून दाखवले. त्याची क्षमता ओपनएआय वा वर उल्लेख केलेल्या कंपन्यांसारखीच आहे. त्यामुळेच चीनकडून पुढे आणल्या गेलेल्या या तंत्रज्ञानाने जगाला मोठा धक्का बसला. याचे जागतिक परिणामही बघायला मिळाले. अगदी सर्वसामान्य लोकही याचा विनामूल्य वापर करु शकणार असल्याने स्पर्धेला तोंड फुटल्याची भीती व्यक्त केली गेली. कंपन्यांना ओपनएआयचा व्यावसायिक वापर करायचा असेल, तर पैसे भरावे लागतात. मेटाचे ‘लामा’ हे सॉफ्टवेअर मात्र फुकट आहे. त्याला ओपन सोर्स म्हटले जाते. आता डिपसीक कंपनीचे बाजारात आलेले एलएलएमही ओपन सोर्स असणे हादेखील एक मोठा आणि महत्त्वाचा घटक समजला गेला. त्यामुळेच चॅटजीपीटी वा जेमिनी या कंपन्यांना सॉफ्टवेअरमधून मिळणाऱ्या निधीला धोका पोहोचण्याची भीती वाढली आणि जागतिक पातळीवर त्याचे आर्थिक पडसाद बघायला मिळाले. या सगळ्या पार्श्वभूमीवर सध्याच्या चर्चेप्रमाणे लार्ज लँग्वेज मॉडेल (एलएलएम) ची निर्मिती भारत नव्याने करणार आहे की त्यासाठी सध्या उपलब्ध असणारे तंत्रज्ञानच वापरणार, याची स्पष्टता अद्याप आलेली नाही. आहे ते तंत्रज्ञान वापरून भारत या क्षेत्रात उतरणार असेल तर हे इतके मोठे काम वा महत्त्वपूर्ण बाब वाटणार नाही. मात्र भारत नव्याने हे तंत्रज्ञान विकसित करणार असेल आणि भारताशी संबंधित असणाऱ्या गोष्टींसाठी त्याचा उपयोग होणार असेल तर निश्चितच त्याला खूप जास्त महत्त्व आहे. याकडे दोन अंगांनी बघावे लागेल.एक म्हणजे याद्वारे भारताशी संबंधित अचूक माहिती मिळेल. जागतिक पातळीवरील लार्ज लँग्वेज मॉडेलमध्ये आपल्या देशातील वेगवेगळ्या प्रकारचे तपशील तितक्याशा मोठ्या प्रमाणात येत नाहीत. तुलना करायची झाल्यास जगाचा ज्ञानकोश आणि भारताचा ज्ञानकोश यात दिसते तसेच अंतर बघायला मिळेल. पण भारत आपल्यासाठी एआय च्या तंत्रज्ञानाची निर्मिती करेल तेव्हा भारताशी संबंधित सर्व छोटे-मोठे तपशील येऊ शकतील. अर्थातच ते स्थानिक व्यापार-उदिमसाठी अत्यंत उपयुक्त ठरू शकतात. अगदी साधे उदाहरण घ्यायचे तर भारतातील कला, संस्कृती, इतिहास अशा बाबींची माहिती तिथे असेल तर सर्व प्रकारचे व्यवसाय, धंदे त्या आनुषंगाने आपला व्यवसाय पुढे नेऊ शकतात. त्या दृष्टीने सॉफ्टवेअर निर्माण करणे वा अशी कामे ते करु शकतात. भारतात येऊ पाहणाऱ्या विदेशी पर्यटकांनी या चॅटजीपीटीला भारताशी संबंधित प्रश्न विचारले, तर अधिक अचूक आणि परिपूर्ण माहिती मिळू शकते. या माध्यमातून ते हवा तेवढा तपशील मिळवू शकतात.लार्ज लँग्वेज मॉडेलमध्ये माहितीचे साठे खूप मोठ्या प्रमाणावर असतात. पण याच्या जोडीला भारतात स्मॉल लँग्वेज मॉडेल्सही तयार होऊ शकतात. ती त्या त्या व्यवसायासाठी, राज्यासाठी वा अगदी गावासाठीही कामी येऊ शकतात, कारण विविध पातळ्यांवर बनवता येऊ शकतात. याला आपण फोकस लँग्वेज मॉडेलही म्हणू शकतो. पण त्याचबरोबर इथे केवळ फोकस माहितीच नव्हे तर, अन्य प्रकारेही कृत्रीम बुद्धिमत्ता मदत करु शकते. जसे की, हे तंत्रज्ञान विशेष मुलांसाठी कशा प्रकारची चित्रे आणि व्हीडिओ असू शकतात, हे बघून त्यानुसार संशोधन समोर मांडेल. थोडक्यात, अशा प्रकारचे अनेक प्रयोग करण्यास मोठा वाव आहे. स्थानिक पातळीपासून देशाच्या पातळीपर्यंत ते राबवता येऊ शकतात. पण त्यासाठी प्रोत्साहन दिले गेले पाहिजे. आवश्यक तेवढा निधी आला पाहिजे. विशेष म्हणजे अगदी छोट्या छोट्या गोष्टींसाठी याचा वापर करुन घेता येतो, यासंबंधीची जाण लोकांमध्ये आली पाहिजे. अशा अंगांनी वापरल्यास हे तंत्रज्ञान लक्षणीय बदल घडवून आणू शकेल. एकदा हे साधले की जागतिक पातळीवरील व्यापारवृद्धीच्या संधी खुल्या होण्यास फारसा वेळ लागणार नाही.

# आपदापासून दिल्लीची मुक्तता भाजपाचे पुनरागमन

दिल्ली विधानसभा निवडणूक निकालाची मतमोजणी काल पार पडली आणि यात अपेक्षेप्रमाणे आप पक्षाचा म्हणजे आम आदमी पक्षाचा सुपडा साफ झाला. २७ वर्षांनंतर भाजपाचे सत्तेत पुनरागमन झाले आहे. याचे श्रेय अनेक घटकांना देता येईल. नरेंद्र मोदी यांचा करिश्मा, त्यांची मतदारांवर अजूनही असलेली जादू आणि आम आदमी पक्षाची नकारात्मक मनोभूमिका यांचा वाटा त्यांच्या दारुण पराभवात मोठा आहे. यापूर्वी भाजपाने १९९३ मध्ये दिल्लीत सत्ता हस्तगत केली होती. त्यानंतर आता इतक्या वर्षांनंतर भाजपा ४७ जागा जिंकून पुन्हा सत्तेत आला आहे. दिल्लीत ५ फेब्रुवारी रोजी ७० जागांसाठी मतदान पार पडले होते. विरोधीपक्षांनी कितीही ओरड केली तरीही मतदात्यांनी भाजपाला असलेली साथ सोडली नाही आणि आपदापासून स्वतःला मुक्त केले. आम आदमी पार्टीचे बहुतेक सारे दिग्गज नेते पराभूत झाले आहेत. त्यात अरविंद केजरीवाल यांचाही समावेश आहे.दिल्ललीत सलग दहा वर्षे सत्ता भोगल्यानंतरही आम आदमी पक्षाला यंदा पराभवाचा फटका बसला आहे. त्याची कारणे अनेक आहेत पण त्यापैकी प्रमुख आहे ते म्हणजे अरविंद केजरीवाल यांच्यासह आम आदमी पार्टीवर भ्रष्टाचाराचे अनेक आरोप झाले. त्यासाठी केजरीवाल तुरुंगात जाऊनही आले. ते आरोप जनतेच्या मनातून धुऊन कधीच निघाले नाहीत. केजरीवाल यांची प्रतिमा भ्रष्टाचारविरोधी नेता अशी होती. पण त्याच पक्षाचे विशेषतः मनीष सिसोदिया आणि अरविंद केजरीवाल यांची प्रतिमा सर्वाधिक भ्रष्ट नेते अशी झाली. त्याचा फटका आम आदमी पक्षाला बसला आहे. यमुना नदीची स्वच्छता, पॅरिसच्या दर्जाचे रस्ते अशी आश्वासने केजरीवाल यांनी दिली होती. ती त्यांना पाळता आली नाहीत हेही कारण त्यांच्या निवडणुकीतील अपयशामागचे आहे.



आम आदमी पार्टीचे नेते केजरीवाल यांना गतवर्षी झालेली अटक आणि नंतर त्यांनी दिलेल्या राजीनाम्यामुळे पक्षाचे नेतृत्व अस्थिर झाले. याचाही फटका पक्षाला निवडणुकीत बसला आहे. भाजपा आणि आप पक्षात फक्त तीन टक्क्यांचा फरक आहे. पण या पराभवाला कारण मध्यमवर्गीयांनी काँग्रेसला दिलेला दणका आहे असे मत काही विश्लेषकांनी मांडले आहे. आम आदमी पार्टीने मध्यमवर्गीयांना गमावले आहे, तर भाजपाने तो मतदार आपल्याकडे पुन्हा कमावला आहे असे काही विश्लेषकांचे मत आहे. कारण इतकी वर्षे केजरीवाल यांनी लोकांसाठी फ्री वॉटर, मोहल्ला क्लिनीक अशी तरतूद केली होती. पण यंदा ती लोकांना भावू शकली नाही. आपने शीश महल आणि मद्य घोटाळा या दोन प्रकरणांमुळेही मतदारांना गमावले आहे. केंद्रीय अर्थसंकल्पामुळे मध्यमवर्गीय मतदार पुन्हा भाजपाकडे वळला असे सांगितले जाते. या वर्गाकडे भाजपाने दुर्लक्ष केले होते. पण आता पुन्हा भाजपाला त्याचे महत्त्व कळले आहे. त्यामुळे या वर्गाशिवाय आपला तरणोपाय नाही हे भाजपाला कळले आहे. केंद्रीय अर्थसंकल्पात १२ लाखांपर्यंतचे उत्पन्न असलेल्यांना करमुक्त केल्याचा जोरदार फायदा भाजपाला झाल्याचे बोलले जात आहे. त्यात केजरीवाल यांनी दिल्लीतील बस प्रवासात महिलांना दिलेल्या सवलती आणि इतर अनेक लाभांचे परिणाम फारच फिके ठरले.

अण्णा हजारे यांनी केजरीवाल यांच्या पराभवाबद्दल भाष्य केले आहे. ते म्हणाले की, उमेदवारांमध्ये आचरण विचार, शुद्ध असणे आणि जीवन निष्कलंक असणे हे गुण मतदारांना भावतात. या आघाडीवर बहुतेक उमेदवारांचे जीवन तपासले असता तसे ते नाही असे लक्षात येते. मतदारांना विश्वास वाटायला हवा, तसा तो केजरीवाल यांनी कधीचाच गमावला होता. त्याचा फटका त्यांना यंदा बसला. दारू आणि संपत्ती यात त्यांचे मुद्दे वाहून गेले. दारूचे दुकान काढून त्याला परमीट द्यायचे हे विचार त्यांच्या मनात शिरले तेव्हाच त्यांचे पतन निश्चित होते. आता भाजपाचे सरकार येणार हे निश्चित झाल्यावर आता भाजपाचे मुख्यमंत्री कोण होणार याची चर्चा सुरू झाली आहे. त्यात दुष्यंत कुमार आणि परवेश वर्मा हे आघाडीवर आहेत. पण आपचा पराभव का झाला याचे विश्लेषण केले असता ही एक बाब प्रकर्षाने समोर येते ती म्हणजे जनतेला आपल्या पायाखालचे साधन समजण्याची आपची प्रवृत्ती त्यांना नडली आहे. शीश महल या केजरीवाल यांच्या निवासस्थानासाठी ४५ कोटी रुपये खर्च करण्याची काहीही गरज नसताना त्यांनी केलेली खेळी अंगाशी आली आहे.दिल्लीचे बहुसंख्य लोक झुग्गीझोपड्यांमध्ये राहत असताना केजरीवाल यांनी आपल्या सरकारी निवासस्थानासाठी इतका मोठा खर्च करण्याची केलेली खेळी त्यांच्या अंगलट आली आहे. १२ वर्षांनंतर आप सत्तेबाहेर झाली आहे. त्यात केजरीवाल यांच्यासह दिग्गज नेत्यांचा समावेश आहे. केजरीवाल हे जेव्हा जेलमध्ये होते तेव्हा दिल्लीची सत्ता सांभाळणारे मनीष सिसोदिया हेही आता पराभूत झाले आहेत. हा झटका मोठा आहे. तरविंदर सिंह मारवाह यांनी त्यांचा पराभव केला आहे. ते त्या अर्थाने जायंट किलर ठरले आहेत. त्यांच्यासोबत अरविंद केजरीवाल, आणि सत्येंद्र जैन यांचाही पराभव झाला आहे. याचा अर्थ लोकांना एकच वेळ फसवता येते. पण वारंवार फसवता येत नाही. केजरीवाल यांनी आप पक्षाच्या माध्यमातून लोकांना वारंवार फसवले आणि त्यांचा या निवडणुकीत सफाया झाला आहे. काँग्रेसचा तर पुरता बोऱ्या वाजला आहे. काँग्रेसची एकही जागा आली नाही. काँग्रेस जी एकेकाळी संपूर्ण देशभरात सत्तेवर होती आणि सत्ता गाजवत होती तिचे आता नामोनिशाण राहिले नाही. काँग्रेसच्या ताब्यातून आणखी एक राज्य गेले आहे आणि भाजपाच्या किटीत ते सामील झाले आहे. अत्यंत सूज्ञ असा हा निकाल आहे आणि तो लोकांनी आपसारख्या पक्षांना तडीपार करून लोकांना एक चांगली शिकवण दिली आहे ती म्हणजे लोकांशी प्रामाणिक राहिले तरच तो तरतो. काँग्रेस आणि आपच्या पराभवाचा हाच मतितार्थ आहे.

# राहुल गांधींना शिवरायांविषयी आस्था नाही भाजपा गटनेते आ.प्रविण दरेकरांचा घणाघात

## नवनिर्वाचित प्रदेशाध्यक्षांनी काँग्रेस वाचविण्यासाठी काम करावे

**मुंबई । प्रतिनिधी**

महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती आज राज्यभरात सर्वत्र साजरी होत असतानाच काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी अकलेचे तारे तोडत छत्रपती शिवाजी महाराज यांना त्यांच्या जयंतीनिमित्त श्रद्धांजली वाहिल्याने शिवप्रेमींत संतापाची लाट उसळली आहे. राहुल गांधी हा मूर्ख माणूस असल्याचे पुन्हा अधोरेखित झालेय. छत्रपती शिवाजी महाराजांविषयी त्यांना किती आस्था आणि गंभीरता आहे हे यावरून दिसून येत असल्याचा घणाघात भाजपा गटनेते आ. प्रविण दरेकर यांनी केला.

पत्रकारांशी बोलताना दरेकर म्हणाले कि, छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती हे काही औपचारिकता पाळण्याचा विषय नाही. ट्विट करताना राहुल गांधी कुठल्या नशेत होते कि, त्यांनी जयंती दिनी श्रद्धांजली अर्पण केली. यामुळे शिवप्रेमींमध्ये प्रचंड संताप निर्माण झालाय. हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज हे आमचे श्रद्धा, दैवत आहेत. त्यांना जयंतीनिमित्ताने श्रद्धांजलीचे ट्विट करणार असाल तर काँग्रेसला शिवभक्त व शिवप्रेमी मुळासकट उखडून महाराष्ट्रात श्रद्धांजली अर्पित केल्याशिवाय राहणार नाही, असा इशाराही दरेकरांनी दिला. विजय वडेट्टीवार यांच्या विधानावर दरेकर म्हणाले कि, मंत्री गोपनीयतेची शपथ घेत असतात. त्यामुळे मंत्रिमंडळाचा अजेंडा गोपनीय असतो. मुखमंत्र्यांनी समज दिली असेल तर ती योग्य व समर्पक आहे. त्याची जाणीव मंत्रिमंडळातील सहकाऱ्यांना राहील. देवेंद्र फडणवीस छत्रपती शिवाजी महाराजांचा आदर्श घेऊन राज्यकारभार करताहेत. गनिमी कावा काय असतो हे महाराष्ट्राने अनेकदा फडणवीसांकडून अनुभवलेय. वडेट्टीवार यांची शोधमोहिमेसाठी आवश्यकता आहे असे वाटत नाही. फक्त यात विरोधकांचा हात आहे कि काय याची काळजी घ्यावी आणि गोपनीयतेचा भंग होणार नाही यासाठी वडेट्टीवार यांनीही सहकार्य करावे. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सकपाळ यांच्या विधानावर दरेकर म्हणाले कि, सकपाळ यांनी आपल्या पक्षात जोडाजोडी करावी. मग भाजपाच्या फोडाफोडीविषयी बोलावे. तुमचा पक्षच एवढा फुटलेला आहे, आपापसात गटतट आहेत त्यांना जोडण्याचे काम नवनियुक्त प्रदेशाध्यक्ष सकपाळ यांनी करावे. काँग्रेसला वाचविण्यासाठी तुम्ही काम करण्याची गरज आहे. केवळ वक्तव्याने काँग्रेस उभारी घेऊ शकत नाही, असा टोलाही दरेकरांनी लगावला.संजय राऊत यांनी केलेल्या विधानावर दरेकर म्हणाले कि, संजय राऊत हळूहळू शरद पवारांच्याबाबतीत वक्तव्य करायला लागलेत. अनेक गुपितं ते बाहेर काढतील. राऊत यांनाही पवारांवर विश्वास राहिलेला नाही. राऊत यांनी शिळ्या कडीला ऊत आणू नये. शिंदेंनी नवीन संसार मांडलाय, ते मुख्यमंत्री होऊन गेलेत. आजही उपमुख्यमंत्री म्हणून महाराष्ट्रात नेतृत्व करताहेत. शिंदे, गद्दार या पलीकडे जाऊन आपली संघटना रोज खिळखिळी होतेय याची काळजी करावी. केवळ पोपटपंची करत राहिलात तर अख्खा पक्ष, कार्यकर्ते, नेते शिंदेकडे जातील. राऊत यांनी बोलघेवडेपणा करण्यापेक्षा काम करावे, अशी कोपरखळीही लगावली.मुंडे-धस यांच्या भेटीचा कट बावनकुळे यांनी रचल्याचा आरोप राऊत यांनी केला होता. त्यावर बोलताना दरेकर म्हणाले कि, बावनकुळे यांचा असा स्वभाव नाही, आमची ती प्रवृत्ती नाही. प्रदेशाध्यक्ष म्हणून बावनकुळे यांनी बोलाविल्यावर पक्षाचा आमदार म्हणून जाणे हे आमचे कर्तव्य आहे. त्या कर्तव्य भावनेतून धस भेटायला गेले. परंतु धस यांच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होता कामा नये. धस यांनी घेतलेले आंदोलन, विषय ते कुठल्याही प्रकारे तडजोड न करता तडीस नेतील. त्यांच्यावर सर्वांचा विश्वास आहे.



# शिवसेना महाविकास आघाडीला नवा धक्का देणार:पुण्यातील मोठे नेते शिवसेनेत येणार

## दोन दिवसात मोठा धमाका; उदय सामंत यांचा दावा

**मुंबई (वृत्तसंस्था)**–पुण्यातील महाविकास आघाडीचे काही बडे नेते दोन दिवसांत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेनेत येणार असल्याचा दावा राज्याचे उद्योग मंत्री उदय सामंत यांनी केला आहे. सामंत यांच्या या दाव्यामुळे शिवसेनेच्या ठाकरे गटासह काँग्रेस व शरद पवार गटात एकच खळबळ माजली आहे.

उदय सामंत गुरुवारी पत्रकारांशी बोलताना म्हणाले की, पुण्यातील काही नेते दोन दिवसांत आमच्या पक्षात येणार आहेत. यात कुणाचा समावेश आहे, हे मी तुम्हाला योग्य वेळी सांगेन. आम्ही या मोहिमेला ऑपरेशन टायगर वगैरे नाव ठेवले नाही. हे नाव तुम्ही पत्रकारांनी ठेवले आहे. एकनाथ शिंदे हे शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचा विचार पुढे घेऊन जात आहेत. त्यामुळे त्यांच्यावर विश्वास ठेवून ठाकरे गटातील अनेक नेते व पदाधिकारी शिंदे गटात येत आहेत. हे सर्वकाही कोणत्याही ऑपरेशनशिवाय होत आहे.ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी महाविकास आघाडीचे सरकार सत्तेत येत असताना शरद पवार व अजित पवारांनी एकनाथ शिंदे यांच्या मुख्यमंत्रीपदाला विरोध केल्याचा दावा केला आहे. उदय सामंत यांनी राऊतांच्या या दाव्याचा समाचार घेताना उद्धव ठाकरेंवर निशाणा साधला. माझ्या माहितीनुसार शरद पवार दुसऱ्यांच्या पक्षात कोणत्याही प्रकारचा हस्तक्षेप करत नाहीत. पण काही लोकांनी (उद्धव ठाकरे) स्वतःला मुख्यमंत्रीपद मिळावे म्हणून एकनाथ शिंदे यांना त्यांना शरद पवारांचा विरोध असल्याचे सांगितले. पण त्यानंतरही शिंदे यांनी ते मोठ्या मनाने स्वीकारले, असे ते म्हणाले.उदय सामंत यांनी यावेळी महाराष्ट्रातील महापुरुषांविषयी आक्षेपार्ह विधान करणाऱ्यांवर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्याची मागणीही केली. छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज यांच्यासह महाराष्ट्रातील सर्वच महापुरुष व संतांवर आक्षेपार्ह ट्विट करून कायदा व सुव्यवस्था बिघडवणाऱ्यांविरोधात देशद्रोहाचा गुन्हा दाखल झाला पाहिजे, असे ते म्हणाले. अभिनेता कमाल खान यांनी काही दिवसांपूर्वी संभाजी महाराजांविषयी वादग्रस्त ट्विट केले होते. त्यावरून महाराष्ट्रात संतापाची लाट उसळली होती. उदय सामंत त्याविषयी बोलत होते.काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी शिवजयंतीदिनी शिवाजी महाराजांना श्रद्धांजली वाहिली होती. उदय सामंत यांनी यावरूनही काँग्रेसवर निशाणा साधला. ते म्हणाले, राहुल गांधी यांना महाराष्ट्राची संस्कृती माहिती नाही. महाराष्ट्रातील महापुरुषांचे कार्य माहिती नाही, अशांना आम्ही इतिहास शिकवावा ही दुर्दैवाची गोष्ट आहे. मी आज रेल्वे प्रवास करताना काही साहित्यिकांसोबत होतो. त्यांनी राहुल गांधी यांनी शिवरायांविषयी केलेल्या ट्विटवर तीव्र नाराजी व्यक्त केली.



# मुख्यमंत्र्यांनी कृषिमंत्र्यांचा राजीनामा घ्यावा:विजय वडेट्टीवार यांची मागणी

## आरोपी मंत्र्यांना क्लिनचीट देऊन पाठराखण करत असल्याचा आरोप

**मुंबई (वृत्तसंस्था)**– शेतकऱ्यांना भिकारी म्हणणारे कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांना कोर्टाने २ वर्षाची शिक्षा सुनावली आहे. आता तरी मुख्यमंत्र्यांनी राजीनामा घ्यावा, अशी मागणी काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार यांनी केली आहे. महायुती सरकारमधील उद्योगी आणि तेजस्वी लोकांमुळे दररोज सरकारची लाज निघत असल्याची टीका त्यांनी केली. मुख्यमंत्री आणि दोन उपमुख्यमंत्री आरोपी मंत्र्यांना स्वतः क्लिनचीट देऊन त्यांची पाठराखण करत असल्याचा आरोपही विजय वडेट्टीवार यांनी केला.

कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांना १९९५ च्या प्रकरणात २ वर्ष कारावास आणि ५० हजार रुपयांच्या दंडाची शिक्षा ठोठावण्यात आली आहे. माणिकराव कोकाटे यांच्यावर कागदपत्रांची फेरफार करून शासनाची फसवणूक केल्याचा आरोप आहे. या खटल्यावर आज नाशिक जिल्हा न्यायालयात सुनावणी पार पडली. यानंतर न्यायालयाने त्यांना शिक्षा सुनावली आहे. यावरून आता विरोधकांकडू महायुती सरकारवर निशाणा साधला असून माणिकराव कोकाटे यांचा राजीनामा घेण्याची मागणी होत आहे.



काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी सोशल मीडिया एक्सवर पोस्ट करत सरकारवर हल्ला चढवला आहे. १९९५ साली कागदपत्रांची फेरफार आणि फसवणूक केल्याचा आरोप माणिकराव कोकाटे यांच्यावर करण्यात आला आहे. यात मंत्री माणिकराव कोकाटे आणि भाऊ सुनील कोकाटे यांना नाशिक जिल्हा न्यायालयाने दोन वर्षांची शिक्षा सुनावली आहे, ५० हजार रूपयांचा दंडही कोर्टाकडून ठोठावण्यात आला आहे. इतके उद्योगी आणि तेजस्वी लोक महायुती सरकारच्या मंत्रिमंडळात आहेत की दररोज सरकारची लाज निघत आहे, असा घणाघात वडेट्टीवार यांनी केला. दररोज आरोप होत आहे, कोर्टाकडून शिक्षेचे आदेश निघत आहे. मुख्यमंत्री आणि दोन उपमुख्यमंत्री आरोपी मंत्र्यांना स्वतः क्लिनचीट देऊन त्यांची पाठराखण करत आहे, असा आरोपही विजय वडेट्टीवार यांनी केला आहे.ठाकरे गटाच्या नेत्या सुषमा अंधारे यांनीही माणिकराव कोकाटे यांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे. सध्या मंत्रिमंडळ आणि लोकप्रतिनिधींमधून कमीत कमी १/३ लोकांवर विविध खटले चालू आहेत. हे लज्जास्पद आहे, अशी टीका अंधारे यांनी केली. प्रकरण न्यायप्रविष्ठ असताना निगरगट्टपणे सरकारमध्ये थांबणे इथपर्यंत ठीक; मात्र जिल्हा न्यायालयाने २ वर्षाची शिक्षा सुनावल्यानंतर अशा मंत्र्याचा तातडीने राजीनामा घेतला गेला पाहिजे, अशी मागणी त्यांनी केली आहे.

# होळच्या मातीचा मल्ल महाराष्ट्र केसरी होईल, तीच खरी मधुकर खाडे यांना श्रद्धांजली ठरेल

**केज (प्रतिनिधी):** मधुकर महाराज खाडे यांनी वारकरी संप्रदायात कार्याचा कळस केला आहे. कुस्ती क्षेत्रातही मोठे कार्य उभा केले. त्यांच्या शिष्यांनी महाराष्ट्र केसरी प्राप्त करून त्यांना श्रद्धांजली अर्पण करावी, अशी अपेक्षा संत भगवान बाबा वारकरी शिक्षण संस्थेचे संस्थापक, व्याकरणाचार्य ह.भ.प.अर्जुन महाराज लाड यांनी व्यक्त केली.

वै.पै.मधुकर महाराज खाडे यांचे दि.६ फेब्रुवारी रोजी अपघाती निधन झाले. केज तालुक्यातील होळ येथे गंगापुजनानिमित्त भगवान [illegible] मंदिरात दि.१३ ते १९ फेब्रुवारी दरम्यान किर्तन सप्ताह संपन्न झाला. ह.भ.प.अर्जुन महाराज लाड हे बुधवारी (दि.१९) काल्याच्या किर्तन सेवेप्रसंगी बोलत होते. त्यांनी संत तुकाराम महाराज यांचा 'अवघेची गोड जाले। मागीलये भरी आले।।१।। साहय जाला पांडुरंग। दिला अभ्यंतरीं संग ।।ध्रु.।। थडिये पावता तो वाव । मागे वाहावता ठाव ।।२।। तुका म्हणे गेले। स्वप्नींचे जागे जाले।।३।।' हा अभंग किर्तन सेवेसाठी घेतला होता. अर्जुन महाराज लाड म्हणाले, मधुकर महाराज खाडे यांच्या आग्रहास्तव मी होळला आलो आणि तब्बल २५ वर्ष झाले वास्तव्यास आहे. आळंदीसारखे तीर्थक्षेत्र सोडून इथे राहिलो, त्याचे पूर्ण श्रेय मधुकर खाडे यांना जाते. त्यांच्या सोबतीला भास्करराव शिंदे असत. या जोडगोळीने संस्थेला आधार दिला. भगवान बाबा वारकरी वारकरी शिक्षण संस्था, वेदांत साधनास्थली आश्रम, छत्रपती शिवाजी महाराज क्रीडा व व्यायामशाळा ही मधुकर खाडे यांच्या कार्याची स्मारके आहेत. आश्रमाचा देशात नावलौकिक आहे. संप्रदायातील पाखवाज वादक मनोज सोळंके हे भारतात प्रथम आले. संतोष महाराज यांनी संगीतात गोल्ड मेडल मिळविले, याचे श्रेय मधुकर खाडे यांना जाते. त्यांनी व्यायामशाळेतून अनेक पैलवान घडविले, आता महाराष्ट्र केसरी, हिंद केसरी होतील असे मल्ल तयार केले. त्यांचा एक तरी शिष्य महाराष्ट्र केसरी व्हावा, तीच खरी श्रद्धांजली ठरेल, असे मत ह.भ.प.अर्जुन महाराज लाड यांनी व्यक्त केले. यावेळी भगवान बाबा वारकरी शिक्षण संस्थेचे पदाधिकारी, आजी -माजी विद्यार्थी, कीर्तनकार, भजनी मंडळी, कुस्ती क्षेत्रातील वस्ताद, पैलवान, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.मधुकर महाराज खाडे हे भगवान बाबा वारकरी शिक्षण संस्थेचे सचिव होते. तसेच, त्यांनी होळ येथे शिवछत्रपती क्रीडा व व्यायामशाळेची स्थापना केली. परंतु ही व्यायामशाळा विकासापासून वंचित राहिली. त्यांना राजकीय मंडळींचे कसलेही सहकार्य लाभले नसल्याची खंत अर्जुन महाराज लाड यांनी व्यक्त करत आर्थिक सहकार्य करण्याचे आवाहन केले. त्यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत उपस्थितांनी व्यायामशाळेसाठी साडेचार लाख रुपयांची देणगी दिली.

# महाराष्ट्राला राष्ट्रीय रग्बी फुटबॉल स्पर्धेत ब्रांझ पदक; बीडचा आदित्य तादळे देशात चमकला

**बीड (प्रतिनिधी):** मध्यप्रदेश मध्ये नुकत्याच १५ व १६ फेब्रुवारी २०२५ झालेल्या राष्ट्रीय रग्बी फुटबॉल स्पर्धेत महाराष्ट्र संघाला ब्रांझ पदक मिळाले. महाराष्ट्राच्या विजेत्या संघामध्ये बीड तालुक्यातील आंबील वडगांव येथील चि.आदित्य ऋषिकांत तांदळे या विद्यार्थ्यांस प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळाली. आदित्यची महाराष्ट्र संघात झालेली निवड व त्यामध्ये त्याने केलेली चमकदार कामगिरी ही अभिमानाची गोष्ट असून त्याचे सर्व स्तरामधून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. सविस्तर वृत्त असे की फेब्रुवारी २०२५ मध्ये मध्यप्रदेश मधील ग्वाल्हेर येथे राष्ट्रीय रग्बी फुटबॉल स्पर्धा संपन्न झाल्या. या संघामध्ये मोरया क्रीडा मंडळ व बीड जिल्हा रग्बी असोशियनचा खेळाडू चि.आदीत्य याची राज्याच्या १५ वर्षे वयोगटातील महाराष्ट्र संघात निवड झाली होती. या स्पर्धेमध्ये देशातील प्रत्येक राज्यातील संघांनी सहभाग घेतला होता. महाराष्ट्र संघाने चमकदार कामगिरी करत महाराष्ट्राला ब्रांझ पदक मिळवून दिले .





या विजेत्या संघामध्ये आदित्य तांदळे याने उत्कृष्ट कामगिरी करुन देशात बीड जिल्ह्याचे चमकावले ही बीड जिल्ह्यासाठी अभिमानाची गोष्ट आहे. या यशाने देशात महाराष्ट्राची मान नक्कीच उंचावली आहे. संघाची मेहनत, जिद्द ,चिकाटी, प्रेरणादायी आहे. महाराष्ट्र संघाने केलेली ही कामगिरी प्रत्येक माणसाच्या हृदयात अभिमान निर्माण करणारी आहे सोबतच बीड जिल्ह्यासाठी ही अभिमानाची बाब आहे. महाराष्ट्र रग्बी फुटबॉल संघात प्रतिनिधित्व करणारा चि.आदित्य हा आंबिल वडगाव ता.जि.बीड येथील मुख्याध्यापक श्री ऋषिकांत तांदळे यांचा मुलगा आहे. तो परभणी केसापुरी गावच्या मातीत लहानाचा मोठा झाला त्याचे प्राथमिक शिक्षण हे जिल्हा परिषद बाळापुर या ठिकाणी झाले नंतर माध्यमिक शिक्षणासाठी श्री शिवाजी विद्यालय बीड येथे झाले. येथेच त्याला श्री .नितीन येळवे सर यांच्या मार्गदर्शनाखाली रग्बी फुटबॉल मध्ये करिअर करण्याचा मार्ग सापडला. कठोर मेहनत , जिद्द बाळगून मिळत गेलेल्या संधीचे सोने करत आदित्यने महाराष्ट्र संघाचे दार ठोठावले आणि यात त्याला यश ही मिळाले. याअगोदर त्याची डिसेंबर २०२२ मध्ये प्रथम १४ वर्षे वयोगटात त्याची राष्ट्रीय शालेय स्पर्धेसाठी महाराष्ट्राच्या संघात निवड झाली व राष्ट्रीय स्पर्धा गुजरात अहमदाबाद येथे पार पडल्या त्यानंतर डिसेंबर २०२४ मध्ये पुन्हा शालेय राष्ट्रीय रग्बी फुटबॉल स्पर्धेसाठी महाराष्ट्राच्या संघात निवड झाली व स्पर्धा बिहार पटना या ठिकाणी पार पडल्या या स्पर्धेत महाराष्ट्र संघाला ब्रांझ ३ीव पदक प्राप्त झाले. प्रत्येक मिळालेल्या संधीवर त्याने कठोर मेहनत व उत्कृष्ट खेळ करत स्वतः सह महाराष्ट्राचे ,बीड जिल्ह्याचे , देशात नाव चमकावले आहे. या यशामध्ये श्री .नितीन येळवे सर, शोएब खाटीक सर, अशोक चौरे सर,ईश्वर कोटारकी मुंबई यांचे मार्गदर्शन लाभले आहे. आदित्य मधील खेळाचे गुण शोधून त्याला प्रथमपासूनच मार्गदर्शन करणारे श्री.येळवे सर यांचे विशेष योगदान आहे.आदित्यने पाच वर्षाच्या काळात तीन राष्ट्रीय स्पर्धेत सहभाग घेतला आहे. त्यामुळे आता त्याची आंतरराष्ट्रीय स्पर्धेच्या सराव शिबिरास निवड झाली आहे .त्याने मिळवलेल्या उत्तुंग यशाबद्दल त्याचा केसापुरी परभणी ग्रामस्थांनी शिवजयंतीचे औचित्य साधून त्याचा सत्कार करण्यात आला. पुढील आंतरराष्ट्रीय स्पर्धेमध्ये सहभागी होऊन बीड जिल्ह्याची मान देशात उंचवावी यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

# अंबाजोगाईतील सर्व शासकीय जागांवरील अतिक्रमणे काढून जागा ताब्यात घेण्याचे शासनाचे आदेश !

## माजी सैनिक वसाहत,फालोअर्स क्वार्टर,सबजेल,यशवंतराव चव्हाण चौक परिसरातील पारधी वस्ती,शिकलकरी वस्ती येथील अतिक्रमित जागांवरील अतिक्रमणे काढली जाणार–कार्यकारी अभियंता गौरीशंकर स्वामी

**अंबाजोगाई । परवेज पटेल**

अंबाजोगाई शहरातील बहुतांशी शासकीय जागा या सार्वजनिक बांधकाम विभाग ताब्यात घेवून त्या ठिकाणची अतिक्रमणे काढली जाणार आहेत तसे आदेश राज्य सरकारचे असून शहारातील सर्व शासकीय जागांवरील अतिक्रमण धारकांनी अतिक्रमण निष्काशीत करावे अन्यथा सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वतीने पोलिस बंदोबस्तात ही अतिक्रमणे काढली जाणार आहेत अशी माहिती सार्वजनिक बांधकाम विभागो कार्यकारी अभियंता गौरीशंकर स्वामी यांनी दिली आहे.

अंबाजोगाई शहरातील बहुतांशी वस्त्या आणि गल्ल्या या शासकीय जागांवर अतिक्रमण करून बसलेल्या आहेत ज्यामध्ये सदर बाजार भागातील फ्लॉवर्स क्वार्टर, सब जेल सदर बाजार अभियांत्रिकी महाविद्यालयासमोरील वसलेली माजी सैनिकांची वसाहत, यशवंतराव चव्हाण चौक परिसरातील दुध डेअरी बाजूची वस्ती अशा इतर जागांचा यात समावेश आहे. राज्य सरकारच्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्यावतीने शहरातील शासकीय जागेवरील आणि विशेषत सार्वजनिक बांधकाम विभागाच्या जागेवर मोठ्या प्रमाणात अतिक्रमण केले असून हे अतिक्रमण तात्काळ निष्काशीत करुन सर्व शासकीय जागा ताब्यात घेण्यात याव्यात असा शासन आदेश दि. २३ जानेवारी २०२५ रोजी निर्गमित झालेला असून त्याचा शासन निर्णय क्रमांक हा सां.ब.ज –२०२४ / प्र.क्र. १७९ / मिव्य १ असा आहे. त्यानुषंगाने सदरील शासन निर्णयात स्पष्ट केले आहे की सार्वजनिक बांधकाम विभागांच्या जागावर अतिक्रमण होणार नाही याकडे कटाक्षाने लक्ष द्यावे तसेच सार्वनिक बांधकाम विभागाच्या भुखंडावरील/ जमीनीवरील अस्तित्वातील अतिक्रमणे तात्काळ निष्काशीत करण्यात यावीत सार्वजनिक बांधकाम विभागाच्या जागेची खाजगी व्यक्ती / संस्था / महामंडळे तसेच शासनाचे इतर विभागाकडून कोणत्याही कारणास्तव मागणी प्राप्त झाल्यास सदर जागा उपलब्ध करुन देणे आवश्यक असल्यास त्यास



शासन मान्यता घेणे आवश्यक राहील यापुढे शासनाची पूर्व परवानगी घेतल्याशिवाय कोणालाही सार्वजनिक बांधकाम विभागाच्या आख्यारितील जमीनीचे हस्तांतरण अथवा भाडयाने दिल्याचे आढळल्यास संबंधीतीविरुद्ध व शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात येईल असा आदेश महाराष्ट्र शासनाचे उपसचिव निरंजन तेलंग यांनी दिला आहे. त्यानुषंगाने अंबाजोगाई शहरातील बहुतांशी भाग हा सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अख्यातरित येतो त्यावर मोठ्या प्रमाणात अतिक्रमण झालेले आहे ज्यामध्ये सदर बाजार भागातील फ्लॉअर्स क्वार्टर या ठिकाणच्या अनेक शासकीय निवासस्थानामध्ये खाजगी व्यक्तींनी शिरकाव करुन जागा बळकावल्या आहेत त्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात खरेदी विक्रीचा व्यवहार झालेला आहे तसेच अभियांत्रिकी महाविद्यालयसमोरील माजी सैनिकांची वसाहत अस्तित्वात आली आहे त्या वसाहतीला मूळ जागा धारकांची, राज्य सरकारची किंवा इतर कुठल्याही शासकीय कार्यालयाची परवानगी नसताना ही वसाहत उभी टाकली आहे. त्या ठिकाणी न्यायालयात माजी सैनिकांच्या विरोधात निकाल गेलेला आहे. अधिकार्याच्या दुर्लक्षामुळे ही वसाहत टिकून आहे तसेच अनेक ठिकाणी नवी अतिक्रमणे वसली आहेत. काही ठिकाणी नाल्यावर अतिक्रमण केले आहे येणार्या काळात त्या ठिकाणी चांगले डबे व दुकाने उभारली जाणार आहेत एकूण या सर्व विषयाच्या अनुषंगाने अंबाजोगाई येथील सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता गौरीशंकर स्वामी यांनी शासन आदेशाचा आधार घेवून अंबाजोगाई शहरातील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या आखतरितील सर्व अतिक्रमणे तात्काळ काढून घ्यावीत असे आवाहन केलेले आहे. अन्यथा पोलिस बंदोबस्तात अतिक्रमणे काढली जातील व होणार्या नुकसानीस संबंधीत अतिक्रमणधारक जबाबदार राहील याची नोंद घ्यावी असे कळविले आहे. वाढते अतिक्रमण ही अंबाजोगाई शहरातील समस्या बनली आहे त्यामुळे अतिक्रमण काढवीत अशी मागणी सामान्य जणातून पुढे येवू लागली आहे.

# परिचर्या संवर्गातील कर्मचाऱ्यांच्या पदोन्नती साठी स्वा.रा.ती. मध्ये काम बंद आंदोलन

**अंबाजोगाई । परवेज पटेल**

महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने पदोन्नती कार्यवाही जलद गतीने करण्याचे परिपत्रक काढले आहे. मुख्यमंत्र्यांनी देखील १०० दिवसांच्या कार्यक्रमात सर्व शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या पदोन्नती प्रक्रियेस गती देण्याचे निर्देश दिले आहेत. मात्र, वैद्यकीय शिक्षण आणि सार्वजनिक आरोग्य विभागाचे सेवा प्रवेश नियम अद्याप मंत्रालय स्तरावर प्रलंबित असल्याने परिचर्या संवर्गातील पदोन्नती रखडल्या आहेत. या समस्येकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी दि. २० फेब्रुवारी २०२५ रोजी स्वा.रा.ती. (स्वामी रामानंद तीर्थ) रुग्णालयातील परिचारक व परिचारिकांनी एक दिवसाचे काम बंद आंदोलन पुकारले परिचर्या संवर्गातील सर्व पदोन्नती सेवाज्येष्ठतेनुसार कराव्यात, परिचारिकांना मिळणारे परिचर्या भत्ते वाढवावेत, ग्रामीण रुग्णालयातील



परिसेविका पद पुनर्जीवित करावे, बंधपत्रित परिचारिकांचा सेवा कालावधी नियमित करावा, बक्षी समिती खंड–२ मध्ये परिचर्या संवर्गावर झालेला अन्याय दूर करावा, परिविक्षा कालावधीसाठी घेतल्या जाणाऱ्या परीक्षेत अधिपरिचारिका पद वगळावे अशा संघटनेच्या मागण्या आहेत गेल्या अनेक वर्षांपासून संघटनेतर्फे या पदोन्नतींसाठी पाठपुरावा केला जात आहे. अनेक बैठका व पत्रव्यवहार करूनही अद्याप काही ठोस निर्णय झालेला नाही. त्यामुळे अखेर परिचारिकांनी आंदोलनात्मक भूमिका घेतली आहे शासनाने दखल न घेतल्यास बेमुदत संपाचा इशारा परिचारिकांनी पुकारलेल्या या एक दिवसीय काम बंद आंदोलनाची दखल शासनाने घेतली नाही, तर पुढील टप्प्यात बेमुदत संप करण्यात येईल, असा इशारा आंदोलनकर्त्यांनी दिला आहे या आंदोलनात महाराष्ट्र गव्हर्मेंट नर्सिंग फेडरेशन संलग्न परिचारिका सेवा संघ, अंबाजोगाईच्या अध्यक्षा श्रीमती चित्ररेखा बांगर, सचिव श्रीमती रागिणी पवार, कार्याध्यक्ष मंगेश सुरवसे, उपाध्यक्ष राम फड तसेच संघटनेचे इतर पदाधिकारी श्रीमती आशा माने, अशोक मोराळे, मनोज जरांगे, नीता घोडके, वर्षा ठाकूर आणि सर्व परिचारक–परिचारिकांनी सहभाग घेतला. शासनाच्या पुढील भूमिकेकडे संपूर्ण परिचर्या संवर्गाचे लक्ष लागले आहे.

# आनंदगाव येथे शिवजन्मोत्सवानिमित्त बाळराजे आवारे पाटील यांचा सत्कार



**केज । प्रतिनिधी**

तालुक्यातील आनंदगाव येथे छत्रपती शिवरायांचे भव्य स्मारक उभारण्यात आले आहे. शिवजयंती निमित्त कार्यक्रम घेण्यात आला. जय जिजाऊ जय शिवराय चा जयघोष सर्वत्र घुमला. कार्यक्रमाच्या अध्यक्षा सरपंच अंजना गोविंद गायकवाड, प्रमुख पाहुणे चळवळीत अग्रेसर असणारे, धर्मवीर छत्रपती संभाजी राजे शौर्य प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य संघटनेचे बाळराजे आवारे पाटील,सामाजिक कार्यकर्ते हनुमंत भोसले यांचा गावकऱ्यांच्या वतीने त्यांचा भव्य नागरी सत्कार करण्यात आला. यावेळी बोलताना बाळराजे आवारे पाटील म्हणाले छत्रपती शिवरायांचा विचार महाराष्ट्रभर घेऊन जाण्यासाठी आपल्या सर्वांचे सहकार्य आवश्यक आहे. गजानन गुरुकुलचे विद्यार्थी यांनी विविध देखावे सादर करून उपस्थितांचे लक्ष वेधले. बाळराजे आवारे पाटील यांच्या हस्ते पुतळ्यास अनावरण करून पूजन करण्यात आले. कार्यक्रमास गावातील नागरिक महिला,विद्यार्थी, शिवप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ हनुमंत सौदागर यांनी केले तर आभार नामदेव गायकवाड यांनी मानले.

# मानेवाडी येथे शिवजयंती मोठ्या उत्साहात साजरी

**चौसाळा । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील मानेवाडी येथे राजाधिराज कुळवाडी भूषण छत्रपती शिवाजी महाराज यांच्या सार्वजनिक शिवमहोत्सवानिमित्त कुळवाडी भुषण राजाधिराज छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला अभिवादन व दीप प्रज्वलन करून करण्यात आले. आलेल्या पाहुण्यांचे स्वागत शाल व श्रीफळ देऊन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात जिजाऊ वंदना गाऊन मानेवाडी चे सरपंच प्रदीप माने यांनी केली. या कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती म्हणून नरेश महाराज संगमेश्वर मंदिर इट.(जि.पानिपत,राज्य हरियाणा) यांची उपस्थिती लाभली.तर प्रमुख पाहुणे म्हणून डॉ.अजित हावळे चौसाळा,प्रा.भिलारे सर




चौसाळा,डॉ.प्रशांत जोगदंड चौसाळा, डॉ.अजय कोकणे पारगाव,डॉ.संकेत धायगुडे चौसाळा,डॉ.सुबोध माने इट, शिवश्री/गोवर्धन मस्के,शेळके सर चौसाळा यांची उपस्थिती लाभली. त्यानंतर शालेय विद्यार्थिनी/ विद्यार्थ्यांनी शिवाजी महाराजांचा इतिहास त्यांच्या भाषणातून मांडला. या व्याख्यान सोहळयास प्रमुख शिवव्याख्याते/शिवश्री प्रा.हरिराम काकडे बीड, शिवश्री बाळासाहेब मस्के बीड, व प्रा.सुधीर म.माने यांनी शिवाजी महाराजांचा इतिहास सर्व उपस्थितीत्यांना सांगितला कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभार समाजसेवक दिगंबर(तात्या)आवारे यांनी केले व मांडले. यावेळी सुखदेव माने (उपसरपंच),पांडुरंग आवारे,भरत माने(पाटील),महादेव माने, प्रा.शिवाजी माने,अनिल टाके, प्रा.आवारे सर,युवराज माने,जेजरथ मोरे,नवनाथ मोरे,सुग्रीव इंगोले, महादेव माने पुढारी, श्रीहरी माने,राजेंद्र माने, पोपट माने,वशिष्ठ माने, प्रा.रमेश माने, दीपक गाडे सर, महावीर माने,दत्तू आवारे,रंजीत माने,नितीन शिंदे,स्वामी माने,राहुल गाढवे, कैलास माने,दिलीप माने,राम शिंदे,सचिन मोरे,श्रीराम डूच्चे,बाबूराव इंगोले,नामदेव वाळस्कर, लक्ष्मण नाईकवाडे,माधव मोरे, शिवाजी डिडवळ,रवी मोरे,अनिल अहिरे, अभिमान व्यवहारे,लहू वाघमारे व अध्यक्ष उपाध्यक्ष सचिव व आयोजक जय भवानी मित्र मंडळ व मानेवाडी येथिल गावकरी मोठया संख्येने उपस्थीत होते शेवटी कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीत घेऊन झाली.

# विद्यार्थ्यांनो अभ्यासात आणि शिक्षणात तडजोड करू नका–आमदार प्रशांत बंब

**छ.संभाजीनगर । प्रा संजय तुपे**

खुलताबाद केंद्रीय लोकसेवा आयोग, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, पोलीस भरती किंवा इतर शासकीय सरळ भरती करता लागणारी सर्व पुस्तके, संगणक व मन एकाग्र आणि शांत रहावं म्हणून एअर कंडिशन अशा सर्व गोष्टी अभ्यासिकेत पुरवू; परंतु अभ्यासिकेत विध्यार्थी, मुलं अभ्यासासाठी आले पाहिजेत. त्याच बरोबर वाचन संस्कृती वाढवली पाहिजे. गावागावातुन आयएस, आयपीएस, पोलीस अधिकारी झाले पाहिजेत त्यामुळे विद्यार्थ्यांनी अभ्यासात आणि शिक्षणात तडजोड करू नये असे प्रतिपादन आमदार प्रशांत बंब यांनी केले.

लासुर स्टेशन येथे गीताबन परिसरात आमदार बंब यांनी ग्राम पंचायतीस – अभ्यासिकेसाठी मोफत जागा दिली होती. – त्यावर नागरीसुविधा योजना २०२२ /२३ अंतर्गत जिल्हा परिषद व सावंगी – ग्रामपंचाय कार्यालयांच्या वतीने क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले मोफत अभ्यासिकेचे बांधकाम करून (दि. १९) शिवजयंती निमित्त आमदार प्रशांत बंब यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी गटविकास अधिकारी वाघचौरे, बाजार समिती सभापती शेषराव अभ्यासिका ज्ञानेश्वर मुकणे यांची उपस्थिती होती. या अभ्यासिकेवर लअंदाजे रुपये ३५ लक्ष खर्च करून करण्यात आले असून यात फर्निचर, तार कंपाउंड, परिसरात पेव्हर ब्लॉक, सौचालय लाईट फिटिंग आदी कामे करण्यात आली आहेत. दरम्यान यावेळी आमदार बंब यांनी जे विद्यार्थी या अभ्यासिकेत येऊ शकत नाही. अंतर दूर आहे अशा विद्यार्थ्यांनी गट करून अभ्यास करण्यासाठी जर पुस्तके लागत असले तर त्यांनी यादी करून मेल करावा असे आवाहन देखील त्यांनी केले. दरम्यान ग्राम पंचायत उपसरपंच संपत छाजेड यांनी अभ्यासिकेसाठी विद्यार्थ्यांना मोफत जागा दिल्याबादल आमदार बंब यांचे आभार मानले. दरम्यान याचवेळी आशा कार्यकर्ता यांना ग्रामपंचायतीच्या वतीने ऑनलाईन काम करण्यासाठी स्मार्टफोन मोबाईल देण्यात आले. यावेळी ग्राम पंचायत सदस्य, कार्यकर्ते, विध्यार्थी, आशा कार्यकर्ता, ग्राम पंचायत कर्मचारी, महिला तसेच नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. जाधव, उपसभापती अनिल चव्हाण, सुरेश मुनोत, प्रीतम मुथा, सरपंच मीना पांडव, उपसरपंच संपत छाजेड, प्रदीप भुजबळ ग्राम विकास लअधिकारी



हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077